# वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा

पहिला मजला, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

फॅक्स क्र. ०२०-२६१३००५४ इ-मेल: vslnapune22@gmail.com


क्रमांक: वपाविय/प्र.मं.कृ.सिं.यो.२.०/SLNA/७३३ /२०२४ दिनांक: १० / १२ /२०२४

प्रति,

१) प्रधान सचिव, (वने) अथवा त्यांचे प्रतिनिधी
२) अपर मुख्य सचिव, (नियोजन) अथवा त्यांचे प्रतिनिधी
३) अपर मुख्य सचिव, (वित्त) अथवा त्यांचे प्रतिनिधी
४) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (सामान्य प्रशासन) अथवा त्यांचे प्रतिनिधी
५) प्रधान सचिव, (कृषि) अथवा त्यांचे प्रतिनिधी
६) प्रधान सचिव, (पाणी पुरवठा व स्वच्छता) अथवा त्यांचे प्रतिनिधी
७) प्रधान सचिव, (पदुम) अथवा त्यांचे प्रतिनिधी
८) अपर मुख्य सचिव, (ग्रामविकास) अथवा त्यांचे प्रतिनिधी
९) प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग अथवा त्यांचे प्रतिनिधी
१०) महासंचालक वाल्मी, औरंगाबाद
११) सह /उप सचिव (मृद व जल संधारण)
१२) अवर सचिव (मृद व जल संधारण)
१३) राज्य प्रमुख, एनआयसी, मुंबई
१४) आयुक्त कामगार, मुंबई
१५) आयुक्त मनरेगा, नागपूर (V. C. द्वारे)
१६) आयुक्त कृषि, पुणे
१७) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
१८) आयुक्त पशुसंवर्धन,
१९) आयुक्त दुग्ध व्यवसाय, पुणे
२०) आयुक्त मत्स्य व्यवसाय, पुणे
२१) ग्रामीण विकास मंत्रालय/नाबार्ड यांचे प्रतिनिधी/केंद्रीय भूसंसाधन विभाग यांनी नामनिर्देशित केलेले सदस्य
२२) अध्यक्ष, एकलव्य सेवाभावी संस्था,परभणी (प्रत्यक्ष/ऑनलाइन सोयीनुसार)
२३) सचिव, अश्वमेघ ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था, फत्तेपूर, तालुका तिवसा, जिल्हा अमरावती (प्रत्यक्ष/ऑनलाइन सोयीनुसार)

विषय : प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत,राज्यस्तरीय
नोडल यंत्रणा (SLNA) ची बैठक दि. २६.११.२०२४ रोजीच्या १२ व्या बैठकीचे इतिवृत्त.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा (SLNA) च्या मंगळवार, दि. २६.११.२०२३ रोजी सकाळी १२.०० वाजता झालेल्या १२ व्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव सोबत जोडत आहे.

Cheku
(सी.के.कलशेट्टी)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
(प्र.कृ.सिं.यो.२.०)
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत-

१. मा. अपर मुख्य सचिव, (मृद व जल संधारण) यांचे स्वीय सहाय्यक.
२. मा. उपसचिव, मृद व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
३. मा. कक्ष अधिकारी, मृद व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या १२ व्या बैठकीचे इतिवृत्त

दि. २६/११/२०२४

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.22.07.2024 रोजीच्या 11 व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.22.07.2024 रोजीच्या 11 व्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये नमूद विषय व त्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत चर्चा करण्यात आली. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.22.07.2024 रोजीच्या 11 व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| २. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे कार्यालयाच्या अंतर्गत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक 2.0 मध्ये असलेल्या "PFMS Expert" व "सहाय्यक लेखा अधिकारी" या कंत्राटी पदांच्या मानधनात वाढ करणेबाबत. | PFMS Expert या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला राज्यामधील पाणलोट समीती, प्रकायं व जिल्हास्तर या तीनही स्तरावर कार्यरत असलेल्या PFMS प्रणाली संबंधीत उद्भवणाऱ्या समस्यां संबंधी मार्गदर्शन करावे लागते. तसेच जिल्हयासाठी Drawing limit निश्चित करुन देणे, केंद्र शासनास पुढील हप्त्यासाठी प्रस्ताव तयार करणे, आयकर व जीएसटी चे रिटर्न फाईल करणे, प्रशासकीय व योजनांचे निधी वितरण करणे, तसेच सन 2022-23 व सन 2023-24 च्या लेखा परीक्षणाबाबत आढावा इ. तसेच आर्थिक बाबीं संबंधित योग्य ती कार्यवाही करुन PFMS प्रणाली सर्व स्तरावर व्यवस्थित कार्यान्वित राहील या बाबत कार्यवाही करावी लागते. या व्यतिरिक्त आकृतीबंधात | PFMS Expert व सहाय्यक लेखा अधिकारी या पदाचे कामकाजाचे स्वरूप व व्याप्ती पाहता PFMS Expert या पदाकरिता रु. 56,660/- व सहाय्यक लेखा अधिकारी या पदाकरिता रु. 61,500/- इतके मानधन निश्चित करण्यास समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | Procurement Specialist चे पद मंजूर नसल्याने या कार्यालयातील खरेदीची कामे करण्यासाठी GeM Portal, E-Mahatender कामेही PFMS Expert या पदास करावी लागत आहेत. त्यामुळे PFMS Expert या पदाचे मानधन हे वसुंधरा कार्यालयातील MIS Expert व GIS Expert या पदांच्या जवळपास असणे आवश्यक आहे अशी चर्चा बैठकीत झाली.<br>सहाय्यक लेखा अधिकारी हे पद PFMS Expert या पदापेक्षा वरिष्ठ असल्याने या पदाचे मानधन हे PFMS Expert पदापेक्षा अधिक असणे अत्यावश्यक आहे. सहाय्यक लेखा अधिकारी या पदावर कार्य करणाऱ्यास राज्यामधील कार्यरत असलेल्या सर्व बँक खात्यामधील झालेल्या खर्चाच्या अद्यावत नोंदी राज्य स्तरावरील कॅशबुक मध्ये घ्याव्या लागतात आणि बँक पासबुक मधील नोंदी यांचा ताळमेळ वेळोवेळी करावा. लागतो. तसेच PFMS Expert व लेखा सहाय्यक यांनी केलेल्या कामावरही त्यांना नियंत्रण ठेवावे लागते. त्यामुळे त्यांच्याही मानधनात वाढ होणे बाबत बैठकीत चर्चा झाली. | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.पदनि-2013/प्र.क्र.112/13/वित्तीय सुधारणा-1, दिनांक-02/12/2013 मध्ये नमुद केल्याप्रमाणे नियमित पध्दतीने पदे भरण्यावरील खर्चाच्या तुलनेत बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेताना खर्चात 10 ते 25% बचत झालीच पाहिजे याची जबाबदारी प्रशासकीय विभाग प्रमुखाची राहील असे म्हटले आहे. त्यानुसार PFMS Expert व सहाय्यक लेखा अधिकारी या पदाचे अनुक्रमे 15% बचत केल्यास PFMS Expert साठी रक्कम रुपये-56,661/- व सहाय्यक लेखा अधिकारी या पदासाठी रक्कम रुपये-61,557/-देणे योग्य राहील अशी चर्चा बैठकीत झाली. | | |
| 3. | प्रधानमंत्री कृषि सिंचनयोजना-पाणलोट विकास घटक 2.0 मध्ये असलेल्या "सहाय्यक लेखा अधिकारी" हे कंत्राटी स्वरुपाचे पद सेवानिवृत्त अधिकारी मधून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने भरणेस मान्यता मिळणेबाबत. | वसुंधरा कार्यालयातील सहाय्यक लेखा अधिकारी हे कंत्राटी पद कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व जबाबदारीचे असून ते पद रिक्त ठेवता येणार नाही. तसेच सदरच्या पदाची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पाहता याप्रमाणे कंत्राटी पद उपलब्ध होणे अवघड जाते. तसेच कंत्राटी पदास शासकीय नियमित पदाप्रमाणे कामकाजाचा अनुभवही कमी पडतो. त्यामुळे या कार्यालयातील सहाय्यक लेखा अधिकारी हे कंत्राटी पद सेवानिवृत्त | वसुंधरा कार्यालयातील सहाय्यक लेखाधिकारी हे कंत्राटी पद सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यामधून जाहिरात देऊन भरण्यास व त्याचे मानधन सामान्य प्रशासन विभागाकडील दि.17.12.2016, 21.02.2018 व 08.09.2023 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निश्चित करण्यास मुख्य | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | शासकीय अधिकाऱ्यामधून जाहिरात देऊन भरण्यास व त्याचे मानधन सामान्य प्रशासन विभागाकडील दि.17.12.2016, 21.02.2018 व 08.09.2023 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांना त्यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यास मान्यता देणेबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.<br>जर सदरचे पद शासकीय अधिकाऱ्यामधून उपलब्धच झाले नाही तर ते रिक्त न ठेवता मनुष्यबळ सेवा पुरवठादार यांचेमार्फत उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी समितीस विनंती केली. | कार्यकारी अधिकारी यांना त्यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यास समितीने मान्यता दिली.<br>जर सदरचे पद शासकीय अधिकाऱ्यामधून उपलब्धच झाले नाही तर ते रिक्त न ठेवता मनुष्यबळ सेवा पुरवठादार यांचेमार्फत उपलब्ध करुन घेण्याचे निर्देश समितीने दिले. तसेच सदर पदाचे मानधन हे इतिवृतातील विषय क्रमांक-2 च्या मान्यतेनुसार रु. ६१,७००/- इतके निश्चित करण्यास समितीने मान्यता दिली. | |
| ४ | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास व जिल्हा आणि तालुका स्तरावरील कार्यरत असणारी कंत्राटी स्वरुपाची पदे मनुष्यबळ सेवा पुरवठादाराद्वारे प्राप्त करुन घेताना जलसंपदा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक- निविदा | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास व जिल्हा आणि तालुका स्तरावरील कार्यरत असणारी कंत्राटी स्वरुपाची पदे मनुष्यबळ सेवा पुरवठादाराद्वारे प्राप्त करुन घेताना उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- भाखंस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक- 1 डिसेंबर, 2016 नुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. महाटेंडरवर दि. ०३/१०/२०२४ रोजी | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास व जिल्हा आणि तालुका स्तरावरील कार्यरत असणारी कंत्राटी स्वरुपाची पदे मनुष्यबळ सेवा पुरवठादाराद्वारे प्राप्त करून घेण्यासाठी तांत्रिक दृष्टया पात्र झालेल्या दोन निविदांवर पुढे जाण्यास व निविदा प्रक्रीया संदर्भात पुढील कार्यवाही करून सेवा पुरवठादार निश्चित करून मुख्य कार्यकारी अधिकारी, | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | 0417/(प्र.क्र.247/17)/ मोप्र-1, दिनांक- 18/10/2023 नुसार कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेबाबत. | मनुष्यबळ सेवा पुरवठादार प्राप्त करून घेण्यासाठी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून तांत्रिक निविदा दि. १४/१०/२०२४ रोजी उघडण्यात आल्या त्यामध्ये एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी दोन निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र झाल्या आहेत. याबाबत उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- भाखंस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक- 1 डिसेंबर, 2016 व प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक 2.0 अंतर्गत कंत्राटी मनुष्यबळ हे जलसंपदा विभागाकडील तांत्रिक कामकाजशी समकक्ष कामकाज करत असल्याने जलसंपदा विभागाकडील शासन निर्णय क्र. निविदा/0417 (प्र.क्र. 247/17) मो.प्र.-1,दि.18.10.2023 अन्वये नुसार कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा यांनी कार्यारंभ आदेश देण्याचे निर्देश समितीने दिले. | |
| ५ | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयात होणाऱ्या सर्व प्रकारच्या ई- निविदा या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने महाटेंडर या वेब साईटवर तसेच जेम्स प्रणालीवर होणाऱ्या ई-निविदा बाबत उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- भाखंस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक- 1 डिसेंबर, 2016 अनुसार | महाटेंडर या वेब साईटवर तसेच जेम्स (जेम) प्रणालीवर ई-निविदा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कार्यारंभ आदेश हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करावेत. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | स्वाक्षरीने व मान्यतेने होण्यास मान्यता मिळणेबाबत.. | कार्यवाही करण्यात येते. तसेच काही प्रकरणी ई-निविदा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अंतिम आदेश देण्यापूर्वी याबाबत शासन स्तरावर मान्यता घेऊन त्यानंतर कार्यारंभ आदेश ई-निविदा केलेल्या बाबीबाबत संबंधितांस निर्गमित करण्यात येतात. तरी त्याऐवजी महाटेंडर या वेब साईटवर तसेच जेम्स प्रणालीवर ई-निविदा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कार्यारंभ आदेश हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्याबाबत समितीत चर्चा झाली. | | |
| ६ | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास व जिल्हा आणि तालुका स्तरावरील खरेदी करावयाचे संगणक, प्रिंटर व अनुषंगिक साहित्य हे मंत्रालयाने दिलेल्या तांत्रिक विनिर्देशिकेच्या (Technical Specification) जवळपास जाऊन आवश्यकतेनुसार खरेदी करण्यास मान्यता मिळणेबाबत. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक 2.0 अंतर्गत राज्य जिल्हा व प्रकल्प स्तरावर संगणक व प्रिंटर खरेदी करीता माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्याकडून तांत्रिक विनिर्देके (Technical speciation) प्राप्त करुन घेऊन Gem Portal वरुन राज्यस्तरीय कार्यालय व अधिनस्त कार्यालयाकरीता संगणक व प्रिंटर ची खरेदी ही एकाच ठिकाणाहून राज्यस्तरीय कार्यालय म्हणजेच वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयामार्फत खरेदीप्रक्रिया करण्यात येऊन संगणक व प्रिंटर चा पुरवठा अधिनस्त कार्यालयांना करण्यात यावा असा निर्णय SLNA च्या 11 व्या बैठकीत घेण्यात आला | वसुंधरा कार्यालयाच्या कामकाजाच्या व त्या अधिनिस्त कार्यरत यंत्रणेच्या कामकाजाच्या आवश्यकतेनुसार सुधारित तांत्रिंक विनिर्देके (Technical speciation) शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्याकडून प्राप्त करून घेऊन त्यानुसार जेम प्रणालीवर संगणक व प्रिंटर यांची खरेदी करावी असे निर्देश समितीने दिले. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभागाचे पत्र क्र. आस्थाप-1122/प्र.क्र.49/जल-5, दि. 16.09.2024 च्या शासनाकडील पत्रान्वये माहिती तंत्रज्ञान विभागाने विहित केलेल्या सर्व साधारण तांत्रिंक विनिर्देके (Technical speciation) प्रत या कार्यालयास प्राप्त झाली असून त्यानुसार जेम्स् प्रणालीवर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. या निविदेच्या पूर्व निविदा बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या तांत्रिंक विनिर्देके (Technical speciation) नुसार फक्त Acer कंपनीचा संगणक येत असून त्याची किंमत जास्त आहे असे कार्यालयाच्या निदर्शनास आले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी समितीस सांगितले. शासनाकडून प्राप्त झालेल्या तांत्रिंक विनिर्देके (Technical speciation) चा विचार केला असता या कार्यालयाचे व अधिनस्त कार्यालयांचे बहुतांशी कामकाज हे फक्त MS Office यामध्येच चालते, त्यामुळे इतक्या मोठ्या तांत्रिंक विनिर्देके (Technical speciation) च्या संगणकाची या कार्यालयास गरज नाही. त्यामुळे या कार्यालयाच्या आवश्यकतेप्रमाणे व कामकाजास उपयुक्त ठरेल अश्या सुधारित तांत्रिंक | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | विनिर्देके (Technical speciation) नुसार जेम्स् प्रणालीवर संगणक व प्रिंटर खरेदी केल्यास शासनाकडील निधीची बचत होण्यास मदत होईल अशी चर्चा बैठकीदरम्यान झाली. | | |
| ७ | मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- आस्थाप-2024/प्र.क्र.85/जल-8, दिनांक- 7 ऑक्टोबर, 2024 अन्वये वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे च्या आस्थापनेवर पाणलोट विकास नियंत्रक (विवक्षीत कामाकरिता) या पदावर करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या तीन पदांना मान्यता देणेबाबत. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास राज्यस्तरीय नोडल यंत्रेणेच्या (SLNA) दिनांक- 31/05/2023 रोजी झालेल्या 6 व्या बैठकीतील परिशिष्ट-क मध्ये 14 शासकीय पदे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच राज्यस्तरीय नोडल यंत्रेणेच्या (SLNA) दिनांक-22/07/2024 रोजी झालेल्या 11 व्या बैठकीतील विषय क्रमांक 2 नुसार प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (PMKSY)-पाणलोट घटक २.० अंतर्गत सह मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरची पदे ही सर्व नियमित शासकीय अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरणे आवश्यक आहे.<br>तथापि मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- आस्थाप-2024/प्र.क्र.85/जल-8, दिनांक- 7 ऑक्टोबर, 2024 अन्वये वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे च्या आस्थापनेवर पाणलोट विकास नियंत्रक (विवक्षीत कामाकरिता) या पदावर करार | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास अपर मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी हे नियमित अधिकारी रूजू झाल्यानंतर, विवक्षित कामाकरिता करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या पाणलोट विकास नियंत्रक या तीन पदांच्या आवश्यकतेचा आढावा घेउन या पदांवर नियुक्त सेवानिवृत्त कंत्राटी अधिका-यांना कार्यरत ठेवणेबाबतचा निर्णय घेण्यात येईल असे निर्देश समितीने दिले. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | पध्दतीने सेवानिवृत्त झालेल्या तीन अधिकाऱ्यांना नियुक्ती देण्यात आलेली असून हे तीनही अधिकारी माहे. ऑक्टोबर, 2024 मध्ये या कार्यालयात रुजू झालेले आहेत.<br>सदरच्या तीनही पदांना आजअखेर राज्यस्तरीय नोडल यंत्रेणेच्या (SLNA) बैठकीत मान्यता देण्यात आली नसून ही पदे भरल्यामुळे त्यांना मूळ मिळणाऱ्या पेन्शन व्यतिरिक्त त्यांच्या पदाच्या देण्यात येणाऱ्या मानधनाचा अतिरिक्त भार शासनावर पडणार असल्याची बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे या तीनही भरण्यात आलेल्या पदांपैकी फक्त एकच पद हे पाणलोट विकास नियंत्रक (विवक्षीत कामाकरिता) याऐवजी या कार्यालयास मान्य असलेल्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी या पदांवर नियुक्त करुन उर्वरित असणारी दोन पदे रद्द करण्याची विनंती मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा यांनी समितीस केली. | | |
| ८ | पाणलोट समिती सचिवांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत व मानधन वाटपाबाबत. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (PMKSY)-पाणलोट घटक २.० अंतर्गत शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग यांचेकडील क्र. कैंपुयो | ज्या जिल्ह्यात राज्यस्तरीय नोडल यंत्रणेने निश्चित केलेल्या पाणलोट समिती सचिवाच्या शैक्षणिक अर्हता (सर्वसाधारण भाग १२ वी | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | 2022/प्र.क्र.07/जल-8, दि. 06/07/2022 नुसार प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी पाणलोट समिती सचिवांची ग्रामसभेद्वारे निवड करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या (SLNA) 5 व्या बैठकीचे इतिवृत्त दिनांक -20/03/2023 नुसार पाणलोट समिती सचिव यांना दरमहा 6000/- रुपये मानधन देण्याचे व शैक्षणिक अर्हता सर्वसाधारण भागाकरिता 12 वी पास व आदीवासी भागाकरिता 10 वी पास असे निश्चित करण्यात आले आहे. या कार्यालयाकडील पत्र क्र. वपावियं/NRM/200/2023, दिनांक-12/04/2024 नुसार याबाबत सर्व प्रकल्प व्यवस्थापक जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.<br>तथापि प्रकल्प व्यवस्थापक जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, बीड यांनी कळविल्याप्रमाणे असे निदर्शनास आले आहे की, बीड जिल्ह्यातील काहीं पाणलोट समिती सचिवांची शैक्षणीक अर्हता 10 वी पास अशी असुन ते आजतागायत कार्यरत आहेत. तसेच संबंधीत पाणलोट समिती सचिवांना | पास व आदिवासी भाग १० वी पास) नुसार पाणलोट समिती सचिवांच्या नेमणुका केल्या नाहीत परंतु सद्यस्थितीत ते कार्यरत आहेत त्यांचे माहे नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंतचे मानधन अदा करण्यात येऊन त्यानंतर त्यांची नेमणूक रद्द करण्यात यावी व राज्यस्तरीय नोडल यंत्रणेने निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हतानुसार पाणलोट समिती सचिवांच्या ग्रामसभेद्वारे निवड करून नेमणुका करण्यात याव्यात, चुकीच्या शैक्षणिक अर्हतेच्या पाणलोट समिती सचिवाची माहे नोव्हेंबर २०२४ नंतर नेमणूक आढळून आली तर त्यांचे मानधन अदा केले जाणार नाही. तसेच राज्यस्तरीय नोडल यंत्रणेने निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार पाणलोट समिती सचिवाच्या नेमणुका होतील यासाठी प्रकल्प व्यवस्थापक तसेच प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा हे जबाबदार राहतील असे निर्देश समितीने दिले. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | कोणतेही मानधन अदा केलेले नाही. तरी संबंधीत पाणलोट समिती सचिव यांना मानधन अदा करावे किंवा कसे ? याबद्दल मार्गदर्शन मागविले आहे.<br>यावरुन असे निदर्शनास आले की, या कार्यालयाकडून सूचना देऊनही जिल्ह्यांनी मंजुर प्रकल्पांतील पाणलोट सचिव यांच्या शैक्षणीक अर्हतेनुसार पाणलोट सचिवांची ग्रामसभेद्वारे बदल करणे अपेक्षीत असताना तसे केलेले दिसुन येत नाही असे सचिव, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. परंतू सद्य: परिस्थीतीत अशा सचिवांनी सदरच्या पदावर काम केले असल्याने त्यांना मानधन मिळणे आवश्यक आहे. तरी ज्या जिल्ह्यांमध्ये अशी प्रकरणे आहेत त्या जिल्ह्यांतील सचिवांचे मानधन माहे नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंत अदा करून त्यांच्या नेमणुका रद्द करून त्याऐवजी सर्वसाधारण भागाकरिता 12 वी पास व आदीवासी भागाकरिता 10 वी पास असे निश्चित करण्यात आलेल्या अर्हतेच उमेदवार नियुक्त करणेबाबत सर्व प्रकल्प व्यवस्थापक, जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र तथा जिल्हा | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | जलसंधारण अधिकारी यांना कळविणेबाबत समितीत चर्चा करण्यात आली. | | |
| ९ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम हा घटक आत्मा यंत्रणेमार्फत राबविणेसाठी आत्मा यंत्रणेने तयार केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांना मान्यता देणे बाबत | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम हा घटक कृषी विभागाच्या आत्मा यंत्रणेमार्फत राबविणेसाठी दि. २७/01/२०२३ रोजीच्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. हा घटक राबविणेसाठी कृषी संचालक, आत्मा यांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांना दि. 0१/०८/२०२३ रोजीच्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत कार्योत्तर मान्यता देण्यात आली. परंतु कृषी संचालक आत्मा यांचे पत्र जा. क्र. कृआ/आत्मा/WDC - २.०/मा.सु/६६२/२०२४ दि. १०/०९/२०२४ नुसार प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांची अंमलबजावणी करताना येत असलेल्या अडचणींमुळे मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करणेबाबत क्षेत्रिय पातळीवरून वारंवार मागणी करण्यात येत होती व सदरची बाब विचारात घेऊन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अंशतः बदल करणे प्रस्तावित आहे व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांच्या मसुद्यास | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम हा घटक आत्मा यंत्रणेमार्फत राबविणेसाठी आत्मा यंत्रणेने तयार केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांना समितीने मान्यता दिली. | आत्मा यंत्रणा व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | आवश्यक ती मान्यता घेण्यासाठी उचित कार्यवाही करण्याबाबत कृषी संचालक (आत्मा) यांनी वसुंधरा कार्यालयास कळविले आहे. या प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांचा सुधारित मार्गदर्शक सूचनांचा मसुदा देखील त्यांनी सादर केला आहे असे सचिव, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा यांनी समितीस सांगितले.<br>प्रेरक प्रवेश उपक्रम या घटकाच्या अंमलबावणीसाठी पूर्वी वितरीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना व कृषी संचालक आत्मा यांनी उपरोक्त नमूद प्रमाणे सादर केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनामधील बदलाबाबत समितीत चर्चा करण्यात आली. **परिशिष्ट अ** | | |
| १० | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उत्पादन पद्धती हा घटक आत्मा यंत्रणेमार्फत राबविणेसाठी आत्मा यंत्रणेने तयार केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांना मान्यता देणे बाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उत्पादन पद्धती हा घटक कृषी विभागाच्या आत्मा यंत्रणेमार्फत राबविणेसाठी दि. २७/01/२०२३ रोजीच्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. हा घटक राबविणेसाठी कृषी संचालक, आत्मा यांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सूचनांना दि. 0१/०८/२०२३ रोजीच्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उत्पादन पद्धती हा घटक आत्मा यंत्रणेमार्फत राबविणेसाठी आत्मा यंत्रणेने तयार केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांना समितीने मान्यता दिली. तसेच या घटकावरील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने असलेल्या तरतुदीनुसार त्वरित निधी खर्च | आत्मा यंत्रणा व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | बैठकीत कार्योत्तर मान्यता देण्यात आली. परंतु कृषी संचालक आत्मा यांचे पत्र जा. क्र. कृआ/आत्मा/WDC -२.०/मा.सु/६६२/२०२४ दि. १०/०९/२०२४ नुसार प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांची अंमलबजावणी करताना येत असलेल्या अडचणींमुळे मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करणेबाबत क्षेत्रिय पातळीवरून वारंवार मागणी करण्यात येत होती व सदरची बाब विचारात घेऊन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अंशतः बदल करणे प्रस्तावित आहे व त्याअनुषंगाने तयार करण्यात आलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांच्या मसुद्यास आवश्यक ती मान्यता घेण्यासाठी उचित कार्यवाही करण्याबाबत कृषी संचालक (आत्मा) यांनी वसुंधरा कार्यालयास कळविले आहे. या पत्रासोबत प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांचा सुधारित मार्गदर्शक सूचनांचा मसुदा देखील त्यांनी सादर केला आहे. सदर मसुदा सचिव, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा यांनी समिती समोर सादर केला. सुधारित मसुद्याबाबत समितीत चर्चा करण्यात आली. **परिशिष्ट ब** | होण्याच्या दृष्टीने आत्मा यंत्रणेने नियोजन करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| ११ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत ५ हेक्टर क्षेत्रावर काटेविरहीत निवडुंगाची रोपवाटिका तयार करणेबाबत. | राज्यस्तरीय मान्यता समितीच्या (SLSC) दि. २३.०७.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये ५ हेक्टर क्षेत्रावरील काटेविरहीत निवडुंगाच्या लागवडीकरिता रु.८.८० लाख इतक्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रती हेक्टर रु.१.७६ लाख इतका खर्च मंजूर आहे. परंतु परिशिष्ट क मध्ये सुचविल्यानुसार बदल करणे आवश्यक आहे तरी परिशिष्ट क मध्ये प्रस्तावित केल्यानुसार बदल करणे आवश्यक असल्याबाबत समितीत चर्चा झाली. | परिशिष्ट क नुसार मान्यता देण्यात आली. तसेच रोपवाटीकेसाठी आवश्यक लागवड साहित्याची वाहतूक करण्यासाठी वाहतूक खर्च म्हणून प्रत्यक्षात येणारा खर्च किंवा रु. १०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती अदा करण्यात मान्यता देण्यात आली व याचा रोपवाटीकेच्या अंदाजपत्रकात समावेश करण्याचे निर्देश समितीने दिले. तसेच अनुषंगिक खर्च म्हणून रु.५,०००/- एवढ्या रकमेचा ही रोपवाटीकेच्या अंदाजपत्रकात समावेश करण्याचे निर्देश समितीने दिले. लागवड साहित्य व त्यासाठी येणारा वाहतूक खर्च BAIF, उरळीकांचन, पुणे या संस्थेस अदा करण्यास समितीने मान्यता दिली. तसेच शेतकऱ्यांना द्यावयाच्या निधीचे देखील टप्पे ठरवून घेऊन हा निधी पाणलोट समिती मार्फत वर्ग करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व जिल्हास्तरीय यंत्रणा व प्रकल्प स्तरीय यंत्रणा |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १२ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून निवड होण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन वाल्मी संस्थेने सादर केलेल्या गुणांकन यादीबाबत पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने निर्णय घेणेबाबत. | शासन स्तरावरून जुलै २०२२ मध्ये वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नेमणूक देण्यासाठी निवडसूची तयार करण्याच्या अनुषंगाने स्वयंसेवी संस्थांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. एकूण ३१४ संस्थांचे प्रस्ताव वसुंधरा कार्यालयास प्राप्त झाले होते. राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या निर्णयानुसार सदरच्या प्राप्त प्रस्तावांची छाननी या योजनेत कार्यरत राज्य प्रशिक्षण संस्था जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छत्रपती संभाजीनगर यांचे मार्फत करण्यात आली असून या संस्थांच्या गुणांकनाची यादी समितीसमोर सादर करण्यात आली. स्वयंसेवी संस्थांच्या निवडीबाबत जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांनी निर्णय घेणे योग्य राहील अशी चर्चा समितीत झाली. | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नेमणूक देण्यासाठी प्राप्त ३१४ प्रस्तावांची छाननी करून गुणांकन यादी तयार करण्यात आली आहे. त्या गुणांकन यादीतील 50 वा 50 पेक्षा जास्त गूण प्राप्त झालेल्या 121 संस्थांची निवडसूची तयार करण्यात आलेली आहे. ही निवडसूची योजनेतील सर्व जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांना कळवावी अशा सूचना समितीने दिल्या. मार्गदर्शक सूचनांमध्ये जरी जिल्हयामध्ये २५% च्या मर्यादित स्वयंसेवी संस्थांना नेमणूक देण्याबाबत नमूद केले असले तरी राज्यामध्ये सद्यस्थितीत या योजनेचा शिल्लक राहिलेला कालावधी पाहता या निवडसूचीतून ज्या प्रकल्पामध्ये कामाची गती अत्यंत संथ आहे अशा प्रकल्पात प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून स्वयंसेवी संस्थांची निवड करण्याचा निर्णय जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांनी त्यांच्या स्तरावरून घ्यावा असे निर्देश समितीने दिले. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र |
| १३ | वगण्यात आला आहे | - | - | - |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १४ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत Watershed रथ यात्रेचे नियोजन करण्याबाबत. | DoLR, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत लोकसहभाग वाढविणे व लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रकल्प क्षेत्रात पाणलोट यात्रेचे नियोजन केलेलं आहे. देशातील इतर राज्यात ही रथ यात्रा नोव्हेंबर २०२४ पासून आयोजित करण्यास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर शासन देईल त्या नियोजनानुसार प्रकल्प क्षेत्रात या रथ यात्रेचे आयोजन करावयाचे आहे. या योजनेअंतर्गत 30 जिल्ह्यातील एकूण ९९ प्रकल्पात या रथयात्रेचे नियोजन करण्याबाबत केंद्र शासनाने ई-मेल द्वारे कळविले आहे. प्रकल्प निश्चिती केंद्र शासनाकडून करून देण्यात आली आहे व या प्रकल्प क्षेत्रात फिरणारा रथ देखील केंद्र शासनाने उपलब्ध करून दिला आहे. या रथ यात्रेदरम्यान नवीन प्रकल्पांचे भूमिपूजन, पाणलोट महोत्सव, श्रमदान, पाणी कि पाठशाला, Watershed warriors यांना पारितोषिक वितरण, भूमी जल पीच इ. उपक्रम राबविण्याबाबत केंद्र शासनाने निर्देश दिलेले आहेत. ही रथयात्रा राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी केंद्र शासनाने | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत क्षमता बांधणी घटकाअंतर्गत वाल्मी संस्थेकडे वर्ग करण्यात आलेल्या निधीतून उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे खर्च करण्यास समितीने मान्यता दिली.<br>ज्या प्रकल्पात ही रथ यात्रा आयोजित करावयाची आहे त्या प्रकल्पामध्ये या आयोजनासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम ठरवून घेऊन त्यानुसार रक्कम वर्ग करण्याबाबत वसुंधरा कार्यालयामार्फत वाल्मी संस्थेस कळविण्यात यावे व त्यानुसार वाल्मी संस्थेने त्यांना क्षमता बांधणी घटकाअंतर्गत वर्ग करण्यात आलेल्या निधीतून सदरचा निधी वसुंधरा कार्यालयाच्या निर्देशानुसार वितरीत करण्यास समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व वाल्मी |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | निवड केलेले जिल्हे व प्रकल्पाअंतर्गत नियोजन करण्यात येईल. तसेच या यात्रेदरम्यान सोशल मिडिया, दृकश्रव्य माध्यमाद्वारे प्रसिद्धी, जिंगल्स, होर्डींग्स तयार करणे, माहिती पुस्तिका तयार करणे, Videos तयार करणे, इत्यादीद्वारे रथयात्रेस प्रसिद्धी देण्याबाबत DoLR यांनी निर्देश दिले आहेत. उपरोक्त अ मध्ये नमूद केल्यानुसार प्रकल्पाअंतर्गत कार्यक्रम आयोजित करताना नियोजन करण्यासाठी जिल्हा स्तरावर निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच राज्यस्तरावरून देखील याबाबत प्रचार प्रसिद्धीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वाल्मी ही संस्था राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत आहे.<br>क्षमता बांधणी घटकाअंतर्गत वाल्मी संस्थेकडे वर्ग करण्यात आलेल्या निधीतून उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे खर्च करण्यास मान्यता मिळणेबाबत समितीमध्ये चर्चा करण्यात आली. | | |
| 15 | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत 47% नैसर्गिक | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
| --- | --- | --- | --- | --- |
| | अंतर्गत 47% नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन (NRM) तरतुदी अंतर्गत फळबाग लागवड घटकाकरीता नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या धर्तीवर अनुदान देण बाबत... | (NRM) अंतर्गत ४७ % तरतुदी अंतर्गत फळबाग लागवड हा घटक मंजूर असून त्याकरिता सध्यस्थितीत मग्रारोहयो योजनेच्या आर्थिक मापदंडाप्रमाणे ३ वर्षात अनुदान देण्यात येते. मग्रारोहयो अंतर्गत पहिल्या वर्षी साधारणतः एकूण देय मूल्याच्या ७५% पर्यंत, दुसऱ्या वर्षी १५% पर्यंत आणि तिसऱ्या वर्षी १०% पर्यंत असे एकूण ३ वर्षात फळबाग लागवडीकरिता अनुदान वितरीत करण्यात येते. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० या योजनेचा अंमलबजावणी कालावधीचा विचार करता फळबाग लागवडीकरिता देय असलेले अनुदान हे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाप्रमाणे २ टप्यात देण्यात यावे अशी मागणी क्षेत्रीय स्तरावरुन केली जात आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातंर्गत पहिल्या वर्षी साधारणत: एकूण देय मूल्याच्या ९०% पर्यंत आणि दुसऱ्या वर्षी १०% पर्यंत असे २ वर्षात फळबाग लागवडीकरिता अनुदान वितरीत करण्यात येते.<br>प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० योजनेत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन (NRM) या घटकातील ४७ % तरतुदी अंतर्गत मग्रारोहयो अंतर्गत देय असलेले अनुदान आर्थिक | संसाधन व्यवस्थापन (NRM) तरतुदी अंतर्गत फळबाग लागवड घटकाकरीता नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या धर्तीवर कृषी विभागाच्या शासन निर्णयानुसार अनुदान वितरीत करण्यास समितीने मान्यता दिली. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | मापदंड न बदलता नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाप्रमाणे २ वर्षात लाभार्थींना अदा करण्याबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. | | |
| १६ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन (NRM) अंतर्गत ४७ % रकमेच्या अधीन राहून प्रकल्प अंतर्गत बाब बदलाचे अधिकार जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) ला प्रदान करणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन (NRM) बाबीकरिता एकूण प्रकल्प मूल्याच्या ४७ % तरतूद आहे. प्रकल्पातील Net Planning नुसार नियोजित कामासाठी आवश्यक असलेला निधी हा योजनेतील NRM घटकातंर्गत उपलब्ध निधीशिवाय उर्वरित आवश्यक निधी इतर योजनांच्या अभिसरणातून करावयाचा आहे. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या प्रगतीचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले आहे की, प्रकल्पतंर्गत मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालाप्रमाणे NRM घटकातंर्गत मंजूर करण्यात आलेली कामे प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करताना बदल करण्याची आवश्यकता निर्माण होत आहे. जसे की, एकाच पाणलोट समितीमध्ये मंजूर रकमेच्या अधीन राहून NRM घटकातंर्गत कामाच्या संख्येमध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता असणे. तसेच प्रकल्पतंर्गत समाविष्ट असलेल्या पाणलोट समित्यांच्या मंजूर कामांपैकी | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन (NRM) अंतर्गत ४७ % रकमेच्या अधीन राहून प्रकल्प अंतर्गत बाब बदलाबाबत वसुंधरा कार्यालयाने मार्गदर्शक सूचना जिल्हास्तरावर वितरीत करण्याचे निर्देश समितीने दिले. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | पाणलोट समिती अंतर्गत NRM कामांच्या संख्येमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे NRM घटकांच्या 47 % मूल्यात बदल न होता उपचाराच्या संख्येमध्ये बदल होत असल्यास सदर बदलास मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) ला प्रदान करण्याबाबत निर्णय घेणेस्तव बैठकीत चर्चा करण्यात आली. | | |
| 17 | ऐनवेळचे विषय -<br>१. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० मध्ये मूल्यमापन व सनियंत्रण घटकाअंतर्गत योजनेच्या मूल्यमापनासाठी बाह्यस्थ संस्थांची नेमणूक करणेबाबत. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या ११ व्या बैठकीत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मध्ये मूल्यमापन व सनियंत्रण घटकाअंतर्गत योजनेच्या मूल्यमापनासाठी बाह्यस्थ संस्थांची नेमणूक करणेबाबत ई-निविदा प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु याबाबत दि. १२/०९/२०२४ रोजीचा नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्र. असास-१३२४/प्र.क्र.८/का.१४१७ नुसार कार्यवाही करणेबाबत समितीमध्ये चर्चा झाली. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० मध्ये मूल्यमापन व सनियंत्रण घटकाअंतर्गत योजनेच्या मूल्यमापनासाठी बाह्यस्थ संस्थांची नेमणूक करणेबाबत दि. १२/०९/२०२४ रोजीचा नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्र. असास-१३२४/प्र.क्र.८/का.१४१७ नुसार कार्यवाही करण्याच्या सुचना समितीने दिल्या. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | २. पाणलोट समिती सचिवांचे मानधन जिल्हा स्तरावरून वितरीत करण्यास मान्यता देणेबाबत. | राज्यस्तरावरून पाणलोट समिती सचिवांचे मानधन सद्यस्थितीत वितरीत करण्यात येत आहे. सद्यस्थितीत राज्यात एकूण ९३७ पाणलोट समित्या कार्यरत आहेत.<br>राज्यस्तरीय कार्यालयात सद्यस्थितीत केवळ तीन (चौदा पैकी) नियमित अधिकारी कार्यरत आहेत तसेच कंत्राटी मनुष्यबळ ही पुरेश्या प्रमाणात उपलब्ध नाही. प्रशासन अधिकारी या पदाचा लेखाधिकारी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. ९३७ सचिवांचे मानधन, त्याबाबतची सविस्तर तपासणी करणे यासाठी बराच कालावधी लागतो त्यामुळे सचिव मानधन वेळेत करण्यास विलंब होतो त्यामुळे सचिवांच्या मानधनाचा निधी जिल्हा स्तरावर वर्ग करून जिल्हा स्तरावरून सचिवांचे मानधन अदा करण्यास मान्यता देणेबाबत समितीस विनंती करण्यात आली. | जिल्हा स्तरावरून सचिवांचे मानधन अदा करण्यास समितीने मान्यता दिली. सचिवांचे मानधन करताना राज्यस्तरीय नोडल यंत्रणा यांनी दिलेले निर्देश, वसुंधरा कार्यालयाने दिलेले निर्देश याचे जिल्हा स्तरावर पालन होणे बंधनकारक राहील. सचिव मानधन अदा करताना द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतचे सर्व लेखे जिल्हा स्तरावर जतन करण्यात यावेत, लेखा परीक्षणासाठी सदरचे लेखे जिल्हा स्तरावर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापक यांची राहील असेही निर्देश समितीने दिले. | |
| | ३. Database Analyst या पदाची शैक्षणिक अर्हता सुधारित करणेबाबत. | Database Analyst या पदाची सध्याची आकृती बंधातील शैक्षणिक अर्हता Post Graduate Degree in computer science, computer application in engineering Graduate in computer/ computer Science अशी असून Database Analyst या पदाचे कामकाज पाहता ही | Database Analyst या पदाची सुधारित शैक्षणिक अर्हता Bachelor of computer Science/ computer application अशी करण्यास समितीने मान्यता दिली. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | शैक्षणिक अर्हता Bachelor of computer Science/ computer application अशी असणे योग्य आहे अशी चर्चा बैठकीत झाली. | | |
| | ४. आकृती बंधातील कंत्राटी पदांच्या मानधनात सुधारणा करण्याबाबत | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा कार्यालय अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधनाबाबत स्मार्ट, आत्मा, भूजल या यंत्रणाअंतर्गत कार्यरत समकक्ष कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पण व मानधन याचा तुलनात्मक अभ्यास करून मानधनात सुधारणा करण्याबाबत निर्णय घेणे योग्य राहील अशी चर्चा बैठकीत झाली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा कार्यालय अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधनाबाबत स्मार्ट, आत्मा, भूजल या यंत्रणाअंतर्गत कार्यरत समकक्ष कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पण व मानधन याचा तुलनात्मक अभ्यास करून पुढील राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | |

वरील प्रमाणे सर्व संबंधितांनी तात्काळ कार्यवाही करावी. उपस्थितांचे आभार मानून बैठक संमन्न झाली.

(प्रकाश खपले) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

(गणेश पाटील)
अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा तथा
सचिव, मृद व जल संधारण,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई